**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ४५/२०२२ मधील</u>**
**<u>निशाणी ६१ वरील आदेश</u>**
**<u>(नारायण शंकर कदम वगैरे वि. सुभद्रा बाळासो धनवडे वगैरे)</u>**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केला आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे तीन प्रकारच्या दुरुस्त्या मागितल्या आहेत. त्यापैकी पहिली दुरुस्ती ही दावा मिळकतीची दक्षिण बाजुची चतु:सिमा सदाशिव नागू गायकवाड यांची वेगळे गटाची जमीन अशी नमुद असून त्यापैकी नागू शब्दास काट देवून जगन्नाथ शब्द लिहण्याची परवानगी मागितली आहे. दुसरी दुरुस्ती ही दावा मिळकतीची उत्तर बाजुची चतु:सिमा शालन शिवाजी पवार यांची गट नं.३० ची मिळकत अशी लिहण्याची परवानगी मागितली आहे. तिसरी दुरुस्ती म्हणजे प्रतिवादी क्र.१ ते ३ हे दावा मिळकतीचा जोपर्यंत कब्जा घेत नाहीत तोपर्यंत वादीस दावा मिळकतीतील त्यांचा कब्जा सुरक्षीत करणेचा अधिकार आहे असे हक्कज्ञापन वादी मागत आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी निशाणी ६३ येथे म्हणणे दाखल करुन असे कथन केले की, दावा दाखल झाल्यानंतर वादीस दाव्याच्या कारणामध्ये किंवा विनंतीमध्ये बदल करता येणार नाही. न्यायालयाने निशाणी १ वर वादीने दाखल केलेला दावा हा हक्कज्ञापनाची दाद न मागता केवळ निरंतर ताकीदीसाठी दाखल केला असल्याने चालण्यास पात्र आहे अगर कसे असा मुद्दा उपस्थित केल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ असुन त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी मागत असलेली दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशत: होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश ? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

मुद्दा क्र.१ व २ करीता –

५. वादी व प्रतिवादींतर्फे युक्तीवाद ऐकला.

६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ अन्वये कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर न्यायालयास योग्य वाटेल तसेच वाद कथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अटीवर दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची मुभा पक्षकारांना देता येते. सदर दुरुस्ती पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णयीत करण्यासाठी आवश्यक आहे अगर कसे हे पाहणे महत्वाचे ठरते. प्रस्तुत दाव्यात अद्याप न्याय चौकशी सुरु झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ मधील प्रथम तरतुदीमध्ये येत आहे.

७. वादीने दुरुस्ती अर्जात दावा मिळकतींच्या चतु:सिमांबाबत मागितलेल्या दोन्ही दुरुस्त्या या औपचारिक स्वरुपाच्या आहेत. त्या दुरुस्त्यांमुळे दाव्यात कोणताही बदल होत नाही अगर प्रतिवादींचे काहीही नुकसान होत नाही. त्यामुळे वादीस नागू या शब्दास काट देवून जगन्नाथ असा शब्द लिहण्याची परवानगी देण्यात येते. तसेच दावा मिळकतीची उत्तर बाजुची चतु:सिमा शालन शिवाजी पवार यांची गट नं.३० ची मिळकत असे नमुद करण्याची परवानगी देण्यात येते.

८. वादीने मागितलेली तिसरी दुरुस्ती ही हक्कज्ञापनाची दाद दाव्यात समाविष्ट करण्याबाबत आहे. वादी दावा मिळकतीवर त्याचा मालकीहक्क प्रस्थापित करीत असून वादीची मालकी प्रतिवादींनी कैफियत दाखल करुन नाकारली आहे. त्यामुळे दावा मिळकतीचा मालकीहक्क वादातीत असल्यामुळे वादीस केवळ निरंतर ताकीदीकरीता दावा दाखल करता येणार नाही. त्याकरीता वादीस दावा मिळकतीतील त्याच्या मालकीबाबत हक्कज्ञापनाची दाद मागणे आवश्यक आहे. निशाणी १ येथे दिनांक ०३.०१.२०२४ रोजी वादीने हक्कज्ञापनाची दाद न मागितल्याने दावा चालण्यास पात्र आहे का असा मुद्दा न्यायालयाने उपस्थित केला.

मुद्दा उपस्थित केल्यानंतर वादीने प्रस्तुत दुरुस्ती अर्जाद्वारे दाव्यात हक्कज्ञापनाची दाद मागितली. परंतू वादीने असे हक्कज्ञापन मागितले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे दावा मिळकतीचा कब्जा जोपर्यंत वादीकडून घेत नाहीत तोपर्यंत वादीस त्याचा कब्जा संरक्षण करण्याचा अधिकार आहे. परंतू हक्कज्ञापनाची दाद ही जर तर वर अवलंबून असू शकत नाही. तसेच वादीची मालकीच वादातीत असल्याने केवळ त्याच्या कब्जाबाबत तो हक्कज्ञापनाची दाद मागू शकत नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर अंशत: होकारार्थी नोंदविते व मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशत: मंजूर करणेत येतो.

२. वादीने प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांचे आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करावी.

PRAJKTA RAJEEV SABNIS
Digitally signed by PRAJKTA RAJEEV SABNIS
Date: 2024.04.15 17:36:37 +05'30'

कडेगांव
दिनांक : ०८/०५/२०२४

(प्राजक्ता रा. सबनीस)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव